दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १६ वे ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.३१ मार्च २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# रिफायनरी प्रकल्प रत्नागिरीतच होणार

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंचे पंतप्रधान मोदींना पत्र

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**नाणार तेलशुद्धीकरण (रिफायनरी) प्रकल्पासाठी आता पर्ययी जागेचा प्रस्ताव महाराष्ट्र सरकारने केंद्र सरकारला दिल्याचं बोललं जात आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी १२ जानेवारी २०२२ ला पंतप्रधान मोदींना रिफायनरी संदर्भात पत्र लिहिल्याचं सांगितलं जात आहे. या पत्रात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्र सरकार रिफायनरीबाबत सकारात्मक असल्याचं सांगितलं आहे. यासोबतच रिफायनरीसाठी नव्या जागेचा प्रस्ताव महाराष्ट्र सरकारला दिला आहे.**



नाणार रिफायनरीला स्थानिकांचा विरोधात आहे. यामुळे नाणार ऐवजी आता रिफायनरीसाठी रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूरच्या बारसू सालेगाव आणि पश्चिम भागातील गावातील काही गावांचा समावेश आहे. बारसू रिफायनरीसाठी जवळपास १४ हजार एकर जमीन आणि बंदरासाठी जवळपास २४१४ एक जागा देण्याची तयारी महाराष्ट्र सरकारने दर्शवल्याचं सांगण्यात येत आहे. रिफायनरी प्रकल्प हा रत्नागिरीतच होणार हे जवळपास निश्चित झालं आहे. मीडिया रिपोर्ट्‌समधून हे सांगितलं जात आहे.

१३ हजार एकर जमीन राजापूर तालुक्यातील बारसू साठी दिली जाऊ शकते. तसंच नाटे येथील २ हजार एकर समुद्र किनाऱ्याची जमीन बंदर उभारणीसाठी दिली जाऊ शकते, असं उद्धव ठाकरे यांनी पत्रात म्हटल्याचं सांगण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे राज्याच्या जीडीपी ८.५ टक्क्यांनी वाढणार आहे. महाराष्ट्र सरकारने रिफायनरी प्रकल्पाबाबत सकारात्मक संकेत दिल्याचं वक्तव्य काही दिवसांपूर्वीच केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी केलं होतं.

नाणारमध्ये रिफायनरीचा प्रस्ताव होता. पण स्थानिकांना नको आहे, त्यांचा विरोध आहे. यामुळे प्रकल्प नेताना स्थानिकांना विश्वासात घेऊ. भूमिपुत्रांचे सोबत चर्चा करून त्यांचे हक्क अबाधित राहतील, याची काळजी सरकार घेईल. त्यांना विश्वासत घेऊनच आम्ही पुढे जाऊ, असं कोकण दौऱ्यावर असलेले शिवसेनेचे युवा नेते आणि पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी मंगळवारी स्पष्ट केलं होतं. शिवसेना रिफायनरी प्रकल्पाबाबत सकारात्मक असल्याचे संकेत आदित्य ठाकरे यांनी दौऱ्यात दिले आहेत. आदित्य ठाकरे तीन दिवसांच्या कोकण दौऱ्यावर आहेत.

# गव्हाण ग्रामपंचायत हद्दीतील सिडकोशी संबंधित जमिनीच्या समस्यांसंदर्भात बैठक

## लोकनेते रामशेठ ठाकूर, आ.प्रशांत ठाकूर यांनी केल्या अधिकाऱ्यांना सूचना




**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील गव्हाण ग्रामपंचायत हद्दीतील साडेबारा टक्के भूखंडांसंदर्भात तसेच सिडकोमार्फत येत्या काळात विविध प्रकल्पांसाठी जमिनी संपादित करण्यात येणार आहे त्यांची नुकसानभरपाई, पुनर्वसन व पुनर्स्थापना याबाबत मंगळवारी सिडको अधिकारी आणि ग्रामस्थांची बैठक आयोजित करण्यात आली होती. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक झाली.

गव्हाण ग्रामपंचायतीच्या कार्यालयात झालेल्या या बैठकीला भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उद्योजक जे. एम. म्हात्रे, ज्येष्ठ नेते रघुनाथ घरत, भाऊशेठ पाटील, सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, कामिनी कोळी, उषा देशमुख, रोशन म्हात्रे, पंकज म्हात्रे, हेमंत पाटील, ज्येष्ठ नेते रतनशेठ भगत, अशोक कडू, वामनशेठ पाटील, अनंता ठाकूर, जयवंत देशमुख, भाऊ भोईर, अजय भगत, सुहास भगत, सुनील पाटील, सिडकोचे अधिकारी अनिल देशमुख, मेट्रो उपजिल्हाधिकारी जनार्दन कासार यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

या बैठकीत ग्रामस्थांनी सिडकोमार्फत साडेबारा टक्के भूखंडाची नुकसानभरपाई मिळण्याबाबात होणारी दिरंगाई तसेच पुनर्वसनासंदर्भात संतप्त भावना व्यक्त केल्या. याच प्रश्नावर लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधिकार्यांना जाब विचारला.

सिडको गव्हाण विभागातील ज्या जमिनी येत्या काळात संपादित करणार आहेत त्या जमिनींचा मोबदला शेतकर्यांना १८ महिन्यांच्या कालावधीतच दिला पाहिजे, अशी प्रमुख मागणी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केली. ग्रामस्थांच्या सर्व समस्यांबाबत लवकर बैठक घेण्यात येणार आहे.

# पनवेल शहर पोलिसांच्या धडक कारवाईत चोरीच्या ८ दुचाकी हस्तगत ; २ आरोपी गजाआड



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर पोलिसांनी ठाणे शहर आयुक्तालयातील गुन्हे शाखा वागळे युनिट-५ च्या मदतीने केलेल्या धडक कारवाईत पनवेल परिसरातील ८ चोरीच्या दुचाकी ज्याची किंमत जवळपास ४ लाख ८८ हजार ५०० रुपये इतकी आहे. हस्तगत केली असून याप्रकरणी दोघा आरोपींना ताब्यात घेतले आहे.

पनवेल परिसरातून गेल्या काही दिवसात मोटार सायकल चोरीचे प्रमाण वाढले होते. या संदर्भात पोलीस उपायुक्त परिमंडळ २ चे शिवराज पाटील यांनी वेळोवेळी पनवेल शहर पोलिसांना मार्गदर्शन करून मोटार सायकल गुन्हे उघडकीस आणण्यासंदर्भात सुचना दिल्या. त्यासंदर्भात सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि विजय कादबाने, पो.नि.दिलीप शिंदे (प्रशा) व पोनि. संजय जोशी (गुन्हे) यांच्या सहकार्याने पन-वेल शहर पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील पो.उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे, पो. हवा.रवींद्र राऊत, पो.ना.महेंद्र वायकर, विनोद देशमुख, रवींद्र पारधी, विवेक पारासुर, पो. शि.प्रसाद घरत आदींच्या पथकाने ठाणे शहर आयुक्तालयातील गुन्हे शाखा वागळे युनिट-५ च्या मदतीने व सहकार्याने शिळफाटा येथील नाकाबंदीमध्ये आरोपी किरण भालेकर (२१) व मयुर पाटील (३३) या दोघांना ताब्यात घेवून अधिक चौकशीमध्ये पनवेल परिसरातील ८ चोरीच्या दुचाकी हस्तगत करण्यात आल्या आहेत.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती उत्साहाने पण आरोग्याची काळजी घेवून साजरी करू : मुख्यमंत्री

## १४ एप्रिल रोजी हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर हे महामानव होते. सुदैवाने कोरोनाचे सावट कमी झाले आहे, मात्र, आरोग्याच्या नियमांचे पालन करून हा जयंती उत्सव आपण उत्साहाने साजरा करूयात. यासंदर्भात आवश्यक ते परिपत्रक गृह विभागाच्या वतीने लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल, असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आज सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीत सांगितले. महापरिनिर्वाण दिनाप्रमाणेच १४ एप्रिल रोजी राज्य शासनामार्फत हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यास गृहमंत्री दिलीप वळसे -पाटील यांनी मान्यता दिली व त्यासंदर्भात कार्यवाही करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.



१४ एप्रिल रोजी होणाऱ्या भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंतीनिमित्त चैत्यभूमी येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या तयारीसंदर्भात आज सहयाद्री अतिथीगृह येथे आयोजित बैठकीस मुख्यमंत्री उद्धव ठाकरे दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीला गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, मत्स्यव्यवसाय विकास मंत्री तथा मुंबई शहरचे पालकमंत्री अस्लम शेख, पर्यावरण राज्यमंत्री संजय बनसोडे, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ तथा माजी राज्यसभा सदस्य डॉ.भालचंद्र मुणगेकर, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव आनंद लिमये, मुख्यमंत्र्याचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव विकास खारगे, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ.महेश पाठक, गृह विभागाचे प्रधान सचिव संजय सक्सेना, पोलीस महासंचालक रजनीश सेठ, मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संजीव कुमार, मुंबई पोलीस आयुक्त संजय पांडे, कोकण विभागीय आयुक्त विलास पाटील, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त कांतीलाल उमाप, विशेष पोलीस महानिरीक्षक कायदा व सुव्यवस्था विश्वास नांगरे- पाटील, मुंबई रेल्वेचे पोलीस आयुक्त कैसर खालिद, मुंबई शहरचे जिल्हाधिकारी राजीव निवतकर व इतर वरिष्ठ अधिकारी तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, आनंदराज आंबेडकर, डॉ.भदंत राहुल बोधी, रवि गरूड, मयुर कांबळे, महेंद्र साळवे यांसह अन्य समन्वय समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, गेली दोन वर्षे डॉ. बाबासाहेबांची जयंती उत्सव व पुण्यतिथीनिमित्त अभिवादन अशा दोन्हीही कार्यक्रमात आपण कोरोना निर्बंधांमुळे अतिशय

…/२

## संक्षिप्त...

### बबनराव लोणीकरांच्या अडचणीत वाढ

**दै.रायगड नगरी । मुंबई**

नोटीस न देता थकीत वीजबिलामुळे मीटर काढून नेल्याचा आरोप करत भाजप आमदार बबनराव लोणीकर यांनी संताप व्यक्त करत सहाय्यक अभियंत्यास शिवीगाळ केल्याची ऑडीओ क्लिप व्हायरल झाली आहे. शिवीगाळसोबतच आमदार लोणीकर यांनी अभियंत्यास आयकर विभागाची धाड टाकण्याची धमकी देखील दिली आहे. याप्रकरणी राज्याचे ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

माजी मंत्री बबनराव लोणीकर यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिलेली धमकी व वापरलेल्या आक्षेपार्ह भाषेबद्दल राऊत यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून लोणीकर यांच्याविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. ज्या अधिकाऱ्याला अशी धमकी मिळाली त्यांना गरज भासल्यास पोलीस संरक्षण देण्यात येईल,' असे राऊत म्हणाले. 'आमदार व माजी मंत्री बबनराव लोणीकर यांच्या ऑडिओ क्लिपच्या बातम्यांची मी दखल घेतली आहे. अभियंत्यांसोबत केलेला संवाद हा धक्कादायक आहे. राज्य सरकारमध्ये कॅबिनेट मंत्रीपद भुषविलेल्या एका ज्येष्ठ राजकीय नेत्याला ही भाषा नक्कीच शोभणारी नाही. स्वतःला संस्कारी म्हणवणा-या एका पक्षाचे ३० वर्षांहून अधिक काळ आमदार राहिलेल्या नेत्याच्या भाषेने या पक्षाच्या संस्काराचाही बुरखा या निमित्ताने फाटला आहे,' असा टोलाही राऊत यांनी लगावला.

# २५ सिलेंडरचे स्फोट झाल्यानंतर तब्बल ११८ अवैध सिलेंडर जप्त

**दै.रायगड नगरी । पुणे**

पुण्यातील कात्रज भागात अवैधरित्या साठा करण्यात आलेल्या २५ गॅस सिलेंडरचे काल स्फोट झाले. यामुळे गॅस एजन्सीजच्या साहाय्याने काळ्या बाजारात होणाऱ्या गॅस विक्रीचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आलाय. पुरवठा विभागाकडून पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधे गेल्या काही दिवसांमधे तब्बल १९८ अवैध सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत.

काल एकामागोमाग एक झालेल्या या स्फोटांनी पुण्यातील कात्रजच्या टेकडीचा परिसर हादरून गेला. एका पत्र्याच्या शेडमधे साठवून ठेवण्यात आलेल्या गॅस सिलिंडरने अचानक पेट घेतला आणि गॅस सिलेंडरचा अवैधरित्या साठवणूक कशी केली जातेय हे पुन्हा एकदा चव्हाट्यावर आलं. पण अशाप्रकारे घरघुती वापराच्या गॅसची साठवणूक करण्याची ही एकमेव घटना नाही.



पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन शहरांमधे मिळून आठ अवैध साठ्यांवर कारवाई करुन १९८ गॅस सिलेंडर जप्त केलेत. गॅसचा हा काळा बाजार गॅस एजन्सीजच्या सहभागाशिवाय अशक्य असल्याच जाणकारांच म्हणणं आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधे घरगुती वापराच्या गॅसच्या पुरवठ्यासाठी ११८ गॅस एजन्सीज आहेत. मात्र या गॅस एजन्सीजकडून वितरीत होणारे सिलेंडर अधिकृत गॅस धारकांपर्यंत पोहचत नसल्याच दिसून येतय. या काळ्या बाजारात गॅस एजन्सीज बरोबर पोलीस देखील सहभागी असण्याची शक्यता वर्तविण्यात येतेय. कारण कात्रजमधे जिथे हे स्फोट झाले, तिथे अनेकदा पोलीस तपासणीसाठी येत असल्याचं समोर आलं होतं, मात्र त्यांनी प्रत्यक्षात काहीच न केल्याच स्थानिकांच म्हणणं आहे. कात्रजमध्ये काल अच-ानक गॅस सिलिंडरच्या स्फोटाचे आवाज ऐकू आले. स्फोट झाला त्यावेळी बाहेर लहान मुले खेळत होती. त्यामुळे एकच धावपळ झाली. लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

# म्हसळा नगरपंचायत कर्मचाऱ्याला शिवीगाळ व मारहाण प्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

## नगरपंचायत प्रशासनाने काळ्या फिती लावून केला जाहीर निषेध

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा नगर पंचायतीचे स्वछता निवारण विभागाचे कर्मचारी सुरेश बंडू जाधव हे दिनांक २९ मार्च रोजी सायंकाळी ४.२५ वाजता शहरा-तील सानेआळी येथे स्वच्छतेबाबतीत तक्रार अर्ज निवारण करण्यासाठी गेले असता तेथील रहिवासी आरोपी नविद दोंदिलकर याने जाधव यांना शिवीगाळ करून मारण्याची धमकी देत धक्काबुक्की केल्याने नगरपंचायत कर्मचारी सुरेश जाधव यांनी आरोपी विरोधात म्हसळा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असता पोलिसांनी आरोपी नविद याचे विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

कर्तव्य बजावत असताना नगरपंचायत सहकारी कर्मचाऱ्याला मारहाण व शिवीगाळ झाले प्रकरणात आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी यासाठी नगरपंचायत प्रशासनाचे सर्व कर्मचारी वर्गाने दिनांक ३० मार्च २०२२ रोजी काळी फीत लावुन झालेल्या घटनेचा निषेध करून कामकाजात भाग घेतला.घटनेची म्हसळा पोलिसांकडुन अधिक माहिती घेतली असता म्हसळा नगरपंचायत स्वच्छता निवारण विभागाचे कर्मचारी सुरेश बंडू जाधव,वय वर्षे ३५,रा.बेलदारवाडी हे म्हसळा सानेआळी येथील नझमा इसहाक देवळेकर यांनी नगरपंचायतिकडे स्वच्छता बाबतीत तक्रार अर्ज दाखल केला होता त्याचे निवारण करण्यासाठी सुरेश जाधव गेले असता आरोपी नविद अब्दुल हमीद दोंदिलकर वय ४२ ,रा.सानेआळी याने सरकारी कामात हस्तक्षेप करून नगरपंचायत कर्मचारी सुरेश जाधव यास शिवीगाळ करून धक्काबुक्की करीत मारुन टाकण्याची

…/२

# पनवेल येथील सार्वजनिक सुलभ शौचालय तोडले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळील सार्वजनिक सुलभ शौचालय पनवेल पालिकेच्या वतीने तोडण्यात आले. मात्र हे सुलभ शौचालय तोडण्याची एवढी घाई का करण्यात आली असा सवाल विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी विचारला आहे.

यापूर्वीदेखील सभागृहात विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे आणि नगरसेवकांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकातील सुलभ शौचालय तोडू नये यासाठी आवाज उठवला होता. तसेच नागरिकांनी देखील हे सुलभ शौचालय चालू ठेवण्यासाठी सांगितले होते. मात्र पालिकेने आर्थिक देवाण-घेवाण मधून शौचालय तोडण्याचा घाट घातला. ३० मार्च रोजी पनवेल मध्ये विरोधी पक्षनेते नसताना पालिकेने हे शौचालय तोडले. शहराच्या मध्यभागी असणारे हे शौचालय नागरिकांच्या उपयोगी पडत असे. एका बांधकाम व्यावसायिकाच्या फायद्यासाठी हे शौचालय पडले असल्याचा आरोप केला जात आहे.



१९९८ मध्ये पनवेल नगरपालिका मार्फत या स्वच्छतागृह बांधण्यात आले आहे. पनवेल मध्ये सामान खरेदी करण्यासाठी व इतर कामांसाठी आलेल्या नागरिकांना हे सुलभ शौचालय सोयीचे ठरत होते. मात्र गेल्या २३ वर्षांपासून नागरिकांच्या सोयीचे ठरत असलेल्या शौचालय पालिकेने तोडले.

# बेकायदेशीररित्या वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशीयांवर न्यायालयाने सुनावणी सजा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात बेकायदेशीररित्या वास्तव्य करणाऱ्या तीघा बांगलादेशीयांविरोधात पनवेल मा.न्यायालयाने सजा सुनावली आहे. यामुळे अशा प्रकारे आपल्या चाळीत किंवा घरात नियमाचे उल्लंघन करून बांगलादेशीयांना वास्तव्य करून देणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नेरेपाडा येथील म्हात्रे चाळ या ठिकाणी अनधिकृतरित्या तीन घुसखोर बांगलादेशीय नागरिक राहत असल्याची माहिती पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि रवींद्र दौंडकर व त्यांच्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार सदर ठिकाणी छापा टाकून श्रीमती.लाखी गुलाम मालिक (४५), मासुद राणा इंदुशेख (२७) व श्रीमती.जमुना मासुद राणा शेख (२१) व सोबत लहान मुलगी कु. नाजिया (१) यांना ताब्यात घेवून त्यांच्या अधिक चौकशीमध्ये त्यांनी कोणतीही वैध

…/२

# ‘घरं’दाज महाराष्ट्र

महाराष्ट्रात गेल्या विधानसभा निवडणुका झाल्या, तेव्हा सर्व उमेदवारांनी संपत्तीचे विवरणपत्र अर्जासोबत जोडले होते. यातल्या विजयी उमेदवारांच्या, म्हणजे आजच्या आमदारांच्या प्रतिज्ञापत्रांचा अभ्यास काही संस्थांनी नंतर केला. त्या पाहणीनुसार ४८.४२ टक्के नवनिर्वाचित आमदार एक ते दहा कोटी रुपयांच्या मालमत्तेचे धनी होते. ४०.३५ टक्के आमदार दहा ते शंभर कोटींच्या श्रेणीत होते. शंभर कोटींच्या वर जवळपास चार टक्के आमदार होते. अनेकांनी शेकडो कोटी रुपयांचे आकडे प्रामाणिकपणे दिले. अनेक संकोची आमदारांनी खऱ्या संपत्तीच्या बढाया मारणे टाळलेही असेल. हे सगळे सांगण्याचे कारण, राज्य सरकारने आमदारांना कायमस्वरूपी घरे देण्याची केलेली घोषणा आणि नंतर त्यावरून चालू झालेली मंत्र्यांची पळापळ. विधानसभेत मुख्यमंत्री म्हणाले होते, ‘लोकांचे झाले हो; पण लोकप्रतिनिधींचे काय? तीनशे सर्वपक्षीय आमदारांना आपण घरे देणार आहोत. त्याबद्दल आनंद होतोय. त्यांनाही राज्याचे विषय मांडल्यानंतर चांगले घर मिळावे.’ मुख्यमंत्र्यांच्या या घोषणेत किमतीचा उल्लेख नव्हता. गोरेगावमध्ये आमदारांची अशी घरकुले बनविण्याची कल्पना महाराष्ट्राला आवडलेली नाही. समाजमाध्यमांमध्ये केवळ रोषच नाही, तर संतापाचा उद्रेक झाला. तो स्वाभाविक होता. शरद पवार यांनी ‘स्वतंत्र गृहयोजना कशाला? म्हाडा किंवा इतर सरकारी योजनांमध्ये इतर घटकांप्रमाणेच आमदारांना घरे मिळावीत,’ असे म्हटले. पवारांचे मत असे असूनही ‘फक्त आमदारांसाठी’ घरे देण्याची घोषणा सरकारने केली, याचा अर्थ किमान काही निर्णय तरी पवारांना न विचारता होतात, असाही होतो. आता या योजनेत कलावंत, साहित्यिक वगैरे जोडून तिला व्यापक बनविण्याची पश्चात बुद्धी सरकारला झाली आहे. लोकस्मृती दुबळी असते; मात्र नरीमन पॉइंट येथे ‘मनोरा’ हे आमदार निवास १९९४मध्ये बांधण्यात आले. या टोलेजंग चार इमारती २०१७मध्येच, म्हणजे अवघ्या २३ वर्षांत अतिधोकादायक झाल्या. दोन वर्षांत जमीनदोस्त झाल्या. तेव्हापासून आत्ता आत्तापर्यंत हे बांधकामाचे कंत्राट कुणाला जाणार, याचा घोळ चालू होता. हे आमदार निवास कायमस्वरुपी नसते, तर आमदार काळापुरते असते. ही चांगली सुविधा असताना, महाराष्ट्रातल्या प्रत्येक आमदाराचे मुंबईत स्वत:च्या मालकीचे घर झालेच पाहिजे, याची नैतिक जबाबदारी सरकारच्या डोक्यावर नियतीने दिली आहे का? तसेही, अनेक राजकीय नेते मुंबईत किती व कशा मालमत्ता घेतात आणि स्वत:चे नावही येऊ देत नाहीत, याच्या अनेक कथा आहेत. मुंबईत लोकप्रतिनिधींनी अनेक सोसायट्या केल्या. त्यांची आलिशान घरे वरळीपासून इतरत्र आजही आहेत. काही लोकप्रतिनिधी, नोकरशहा आदी सदस्य असणारी दक्षिण मुंबईतली ‘आदर्श’ गृहनिर्माण संस्था महाराष्ट्र अजून विसरलेला नाही. ते प्रकरणही पुरते संपलेले नाही. हा घोटाळा उघड झाल्यानंतर, तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी धाडसी निर्णय घेऊन, अशा प्रकारच्या सर्व नवीन सोसायट्या करण्यावर स्थगितीच आणली. ज्यांना अशा जमिनी आधी दिल्या होत्या, त्यांचे काम नीट चालू आहे ना, याच्याही चौकशीचे आदेश दिले. इतके असूनही, ते मुख्यमंत्री असतानाच लोकप्रतिनिधींनी किमान सात गृहनिर्माण सोसायट्यांचे प्रस्ताव त्यांना सादर केले. तेव्हाही, अनेक सरकारी जागा या सोसायट्यांचे प्रवर्तक नाके मुरडून नाकारत होते. असा सारा इतिहास असताना, या विषयाला आत्ता हात घालण्याचे सरकारला काहीही कारण नव्हते. लोकप्रतिनिधींचे वेतन वाढते, त्यांच्यासाठी घरांच्या योजना होतात, तेव्हा एरवी नैतिकतेच्या गप्पा मारणाऱ्या अनेक नेत्यांच्या तोंडाला कुलूप बसते. आज महाराष्ट्राच्या राजकारणात इतके नेते बिल्डर आणि बांधकाम व्यावसायिक आहेत, की त्यांनी नुसते मनात आणले, तरी सर्व आमदारांना कायमचे आलिशान फ्लॅट देऊन, ते या लोकप्रतिनिधींच्या लोकसेवेच्या व्रतामध्ये खारीचा वाटा उचलू शकतील. नेत्यांमधला हा बंधुभाव जागा झाला, तर कर्जबाजारी महाराष्ट्र सरकारच्या डोक्यावरचे ओझे तेवढेच कमी होईल. निदान आमदारांच्या घराची चिंता मिटल्यास एसटी कामगारांच्या संपाकडे तरी थोडे लक्ष देता येईल. महाराष्ट्र आत्ता कुठे करोनाच्या कराल पर्वातून बाहेर येतो आहे. अजूनही सगळ्यांचे रोजगार धड नाहीत. हजारो माणसे अर्धपोटी झोपत आहेत. अशा परिस्थितीत आमदारांचा निधी कोटी कोटीने वाढवायचा, त्यांच्यासाठी मुंबईत घरांच्या कल्पना मांडायच्या, इतके राज्यकर्ते असंवेदनशील कसे झाले आहेत? आज नेत्यांनी असे वागताना मनाशी खरे तर एकच निकष लावायला हवा. तो म्हणजे, ‘आज यशवंतराव चव्हाण असते, तर ते कसे वागले असते?’ उभा जन्म राजकारणात काढल्यानंतर कराडला छोटेसे घर बांधण्याचा विचार मनात आला, तेव्हा यशवंतरावांनी वेणूताईंकडे ‘पण पैशाचे कसे करायचे, ते पाहावे लागेल,’ अशी काळजी बोलून दाखवली होती. आज या सत्यकथा कुणालाही रुचणार नाहीत. ‘घरं’दाज महाराष्ट्र एव्हाना फार पुढे गेला आहे.

# म्हसळ्यात २ रुग्णवाहिका पण विनापयोगी ; म्हसळा ग्रामिण रुग्णालयातील तातडीच्या रुग्णांना त्रास

**दै.रायगड नगरी । दिघी**

म्हसळा येथील ग्रामीण रुग्णालयाच्या आवारात १०२ व १०८ च्या दोन रुग्णवाहिका आहेत. मात्र, १०२ च्या रुग्णवाहिका साठी चालक च न दिल्याने गेल्या वर्षभरापासून ती विनापयोगी आहे. तर १०८ च्या रुग्णवाहिकासाठी डॉक्टर नसल्याने ती असून नसल्यासारखीच आहे. यामुळे रुग्ण व रुग्णांच्या नातेवाईकांना याचा मोठा मानसिक व आर्थिक त्रास होत आहेत. लोकप्रतिनिधी व जिल्हा प्रशासन मात्र, बघ्याची भूमिका घेत असल्याने याबाबतीत संताप व्यक्त केला जातोय.



सध्यस्थीतीत ग्रामीण रुग्णालयात १०२ ची रुग्णवाहिका उभी असते मात्र, चालक नसल्याने विना वापर पडून आहे. विशेष म्हणजे कोव्हीड रुग्णालय उद्घाटन प्रसंगी रुग्णवाहिका हस्तांतरित केली होती. तिथपासून चालक नसल्याने ती पडून आहे. याचा सर्वाधिक फटका बाहेरगावच्या रुग्णांना सोसावा लागत आहे. सोबतच अपघाती रुग्णांनादेखील याचा फटका सहन करावा लागत आहे. रुग्णवाहिका उपलब्ध होत नसल्याने रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना ऐनवेळी धावपळ करून स्वतःच्या पैशाने रुग्णवाहिका भाड्याने घ्याव्या लागत आहेत. यामुळे उपचारासाठी म्हसळा व श्रीवर्धन तसेच तळा तालुक्यातील आलेल्या रुग्णांना अतिरिक्त खर्चाला सामोरे जावे लागत आहे. जिल्हा प्रशासनाने रुग्णवाहिकांची दखल घेतल्यास गरीब रुग्णांची अडचण दुर होऊ शकते.

१०८ रुग्णवाहिकेत आवश्यक व पुरेसा औषधसाठा नाही, डॉक्टरची नेमणूक केली. मात्र, सेवा नाही अशा विविध ‘व्याधीं’नी ही सेवा गेल्या सुमारे कित्येक वर्षांपासून महिन्यांपासून ग्रस्त झाली आहे. त्याचा परिणाम रुग्णांच्या वाहतुकीवर, तातडीने सरकारी रुग्णालयात पोहचवण्यावर झाला आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी डॉक्टर ऑनलाइन नसल्याने १०८ ची रुग्णवाहिका आऊट ऑफ सर्व्हिस दाखवली जाते व तातडीच्या वेळी तळा किंवा माणगांव येथून रुग्णवाहिका उपलब्ध होते.

# तोतया पोलिसांनी सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकाऱ्याची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकाऱ्याची दोन तोतया पोलिसांनी फसवणूक केल्याची घटना पनवेल शहरातील तक्का परिसरात घडली आहे.

सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी वामन गायकवाड (६२) हे तक्का परिसरात राहतात. ते नेहमीप्रमाणे पंचमुखी हनुमान मंदिरात दर्शनासाठी गेले होते. दर्शन घेवून पायी चालत पनवेल रेल्वे स्टेशनच्या दिशेने पायी जात असताना दोघा तोतया पोलिसांनी त्यांना रस्त्यात अडवून पुढे नाका बंदी सुरू असल्याचे सांगून त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने काढून देण्यास बजाविले. घाबरलेल्या गायकवाड यांनी दागिने काढून तोतया पोलिसांकडे दिले. दागिने कागदात बांधून देण्याचा बहाणा करून हातचलाखीने सदर दागिने स्वतः च्या ताब्यात ठेवून त्यानंतर तेथून त्यांनी पलायन केले. आपली फसवणूक झाल्याचे गायकवाड यांच्या लक्षात येताच त्यांनी याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली आहे.

# शिवसेनेने वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना विचारला जाब

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून विज बिल थकबाकी असणाऱ्या ग्राहकांना नोटीस न देता विद्युत पुरवठा बंद म्हणजेच मीटर काढून नेल्याबद्दल कामोठे वसाहतीमधील शिवसैनिकांनी संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला आहे.

शिवसेना उपमहानगर प्रमुख प्रभाकर गोवारी यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ खांदा कॉलनी येथे शिवसेना कामोठे तर्फे चांगलेच धाऱ्यावर धरले. कामोठे शहरातील नागरिकांच्या तक्रारीनुसार महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून विज बिल थकबाकी असणाऱ्या ग्राहकांना नोटीस न देता विद्युत पुरवठा बंद म्हणजेच मीटर काढून नेण्यात येतो. सदर कारवाई हि विद्युत अधिनियम २००३ कलम ५६ नुसार करण्यात येते का ? असा जाब विचारण्यात आला.

जर अश्या प्रकारची कारवाई नियम बाह्य पद्धतीने होत असेल तर शिवसेनेच्या पद्धतीने उत्तर देण्यात येईल असा इशारा देण्यात आला. यावेळी कामोठे उपशहरप्रमुख लकित सोडेवाले, सौ. संगीत राऊत ( उपमहानगर संघटिका), नागसेन मोरे (उपशहर प्रमुख) व विभाग संघटीका सौ. सोनल तांबे उपस्थित होते.

# राज्यपालांच्या हस्ते ठाणे, नवी मुंबई येथील विविध क्षेत्रातील कोरोना योद्धे सन्मानित

**दै.रायगड नगरी । मुंबई**

समाजाला जिवंत ठेवायचे असेल तर स्वतःच्या नोकरी-व्यवसायापलीकडे जाऊन समाजासाठी समर्पण भावनेने कार्य करणे आवश्यक आहे. समर्पण, त्याग व सेवा भावनेमुळे कामाचा आनंद मिळतो तसेच समाजाची उन्नती देखील साधते, असे प्रतिपादन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी आज येथे केले.

महाराणा प्रताप राजपूत महासंघ व अर्पण फाउंडेशन यांच्यातर्फे ठाणे व नवी मुंबई येथील शिक्षण, पोलीस, वैद्यकीय सेवा व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ८० व्यक्तींना राज्यपाल कोश्यारी यांच्या हस्ते मंगळवारी (२९ मार्च) राजभवन येथे ’डायनॅमिक सोशल लीडर’ पुरस्कार प्रदान करण्यात आले, त्यावेळी राज्यपाल बोलत होते.

कार्यक्रमाला नवी मुंबईचे माजी महापौर सागर नाईक, महाराणा प्रताप राजपूत महासंघाचे अध्यक्ष धनंजय सिंह, महाराणा प्रताप राजपूत महासंघाचे संस्थापक अमरसिंह ठाकूर, अर्पण फाउंडेशनच्या भावना डुंबरे व उद्योजक प्रेमजी गाला प्रामुख्याने उपस्थित होते.

सामान्य परिस्थितीत लोक तसेच राजकीय नेत्यांमध्ये आपापसात मतभेद असतात. परंतु देशावर संकट आले की सर्वजण एक होऊन देशासाठी काम करतात.

संकटकाळी देशातील एकतेचा अनुभव आपण १९६२, १९६५, १९७१ तसेच कारगिल युद्धाच्या वेळी घेतला असे नमूद करुन कोरोना काळात देशातील एकता पुनश्च पाहायला मिळाली असे राज्यपालांनी सांगितले.

डॉक्टर्स, शिक्षक, पोलीस कर्मचारी व समाज सेवकांनी या काळात विशेषत्वाने चांगले कार्य केले असे सांगताना राज्यपालांनी सर्व पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले. राज्यपालांच्या हस्ते यावेळी सिंघानिया शिक्षण समूहाच्या अध्यक्षा रेवती श्रीनिवासन, महेश कुडव, प्रेमजी गाला, डॉ ए के फजलानी, सिम्मी जुनेजा, निलू लांबा, शेखर दादरकर, डॉ ज्योती रविशंकर नायर, चित्रा कुमार अय्यर, ज्युपिटर हॉस्पिटलचे संचालक डॉ अमित सराफ, भूलतज्ज्ञ डॉ सोनाली सराफ यांसह ८० व्यक्तींना यावेळी डायनॅमिक सोशल लीडर पुरस्कार देण्यात आले.

# नवघर येथे नाईट क्रिकेट भाई चषक 2022 चे शानदार शुभारंभ

**दै.रायगड नगरी । उरण**

सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असणारी संस्था सुधीर घरत सामाजिक संस्था आणि याच संस्थेच्या वतीने उरण तालुक्यातील मानाची समजली जाणारी क्रिकेट स्पर्धा भाई चषक २०२२ चे आयोजन २९ मार्च ते १ एप्रिल २०२२ या दरम्यान तु, ह वाजेकर नागरी मैदान नवघर येथे करण्यात आले आहे.त्याचा शुभारंभ कामगार नेते सुधिर घरत यांच्या हस्ते करण्यात आले.

सदर क्रिकेट सामन्यांच्या उद्घाटन प्रसंगी कामगार नेते दिनेश घरत, उद्योजक किसन जी शर्मा, पोलीस अधिकारी श्री जगदाळे, भाजप जिल्हा उपाध्यक्ष निळकंठ घरत, उरण उत्कर्ष समिती अध्यक्ष गोपाळ पाटील, माजी उपसभापती महादेव बंडा, माजी जिल्हा परिषद सदस्य जनू शेठ भोईर, भाजपचे नेते चंद्रकांत घरत, भाजप सरचिटणीस दिपक भोईर, उद्योजक विकास नाईक, सुरेश तांडेल, पंचायत समिती सदस्य दिपक ठाकूर, किरीट पाटील, उद्योजक संजय पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मनोज भगत, समीर सुर्वे, रायगड भूषण गिरीश म्हात्रे, गायक हितेश कडू, भुपेंद्र घरत, प्रदीप भोईर, अनिल पाटील, आदी सह क्रिकेट प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या स्पर्धेचे सूत्र संचालन नितेश पंडित यांनी केले तर सामन्यांचे समालोचन जीवन डाकी यांनी केले.



# ग्रामीण महिला मेळाव्याचे आयोजन; चारशेहून अधिक महिलांचा सहभाग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

टाटा स्टीलने खालापूर तालुक्यातील सावरोली येथे असलेल्या त्यांच्या प्लांट जवळील टाऊनशिपमध्ये महिला सक्षमीकरण आणि उद्योजकता प्रकल्पांतर्गत महिला मेळाव्याचे आयोजन केले होते. टाटा स्टील कंपनीच्या सीएसआरविंग आणि वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्टच्या भागीदाराच्या सहकार्याने आयोजित केलेल्या या प्रकल्पाचा उद्देश महिलांच्या अनुभवांचा व विचारांची देवाणघेवाण सुलभ करणे, महिलांशी संबंधित विविध समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि स्त्रीत्व साजरे करणे हे होते. १९ व्या शतकातील थोर समाजसुधारक, शिक्षणतज्ज्ञ आणि महाराष्ट्राच्या कवयित्री सावित्रीबाई फुले यांना श्रध्दांजली अर्पण करून या कार्यक्रमाची सुरुवात झाली. गटविकासअधिकारी बालाजी पुरी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.प्रसाद रोकडे, नायब तहसीलदार राजश्री जोगी, टाटा स्टील प्लांटप्रमुख कार्यकारी कपिल मोदी यांनी कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन केले. यामध्ये देवन्हावे व सावरोली पंचायतीतील सुमारे ४०० महिला सहभागी झाल्या होत्या. यावेळी सरपंच प्राची लाड, सदस्य भूषण कडव, डब्ल्यूओटीआर व्यवस्थापक प्रीतिलता गायकवाड, सहायक गटविकास अधिकारी महादेव शिंदे, सीएसआरव्यवस्थापक भावेश रावल आदी उपस्थित होते. यावेळी सावरोली जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी गीते सादर करून पथनाट्य म्हणून प्रसिद्ध असलेले नुक्कड नाटक सादर केले. या उपक्रमासाठी टाटा स्टीलचे कौतुक करताना पुरीम्हणाले, डब्ल्यूइइ सारख्या हस्तक्षेपामुळे ग्रामीण महिलांमध्ये आर्थिक सर्व समावेशकता, उपजीविका कार्यक्रम आणि एंटरप्राइझ डेव्हलपमेंट याद्वारे कसे बदल घडत आहेत हे पाहून आनंद होतो.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## आरोग्याची काळजी घेवून साजरी करू : मुख्यमंत्री

संयम पाळला आणि नियमांचे काटेकोर पालन केले ही खरोखरच खूप मोठी गोष्ट आहे. आता हे कोरोनाचे सावट कमी झाले आहे आणि या महामानवाची जयंती आपणा सर्वांना उत्साहाने साजरी करायची आहे.महानगरपालिका आणि पोलीस यांनी नेहमीप्रमाणे संपूर्ण नियोजन व तयारी केली आहे. राज्यभरात देखील उत्साहाने तसेच आरोग्याचे नियम पाळून हा उत्सव साजरा करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील म्हणाले, आरोग्य नियमांचे पालन करूनच जयंती साजरी करावी लागेल. साधारण परिस्थितीत आपण ज्या प्रथा-परंपरा पाळून जयंती साजरी करतो, त्या सर्व गोष्टी तितक्याच सन्मानपूर्वक केल्या जातील. आपण सर्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे अनुयायी आहोत. त्यामुळे जयंती उत्सवाच्या अनुषंगाने सर्व उपाययोजना मुंबई महापालिका आणि राज्य शासनाच्या वतीने करण्यात येतील. राज्य शासनाच्या वतीने मार्गदर्शक सूचना आगामी चार दिवसात प्रसिद्ध करण्यात येतील, ज्यायोगे तयारीसाठी सर्वांना पुरेसा वेळ मिळेल असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. महापरिनिर्वाण दिनाप्रमाणे जयंती दिनी राज्य शासनाच्या वतीने चैत्यभूमी येथे हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टीची मागणी यावेळी मान्य करण्यात येऊन त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना गृहमंत्री श्री वळसे पाटील यांनी मुख्य सचिव आणि संबंधित यंत्रणेला दिल्या.

यावेळी मुंबई महापालिकेचे सहायक आयुक्त किरण दिघावकर यांनी मुंबई महापालिकेतर्फे जयंती निमित्त करण्यात येणाऱ्या उपाययोजना संदर्भातील माहितीचे सादरीकरण बैठकीत केले. कोरोना निर्बंध शिथील झाल्यामुळे जयंतीला येणाऱ्या अनुयायांची संख्या वाढू शकते या धर्तीवर प्रशासनाने विविध उपाययोजना कराव्यात अशी मागणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीच्या वतीने विविध सदस्यांनी केल्या.

## शिवीगाळ व मारहाण प्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

धमकी दिली तसेच आरोपीने स्वतः जळणीसारणाची व्यवस्था न करता त्याचे घरातील सांडपाणी सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर सोडुन घाण करून उपद्रव केला असल्याने त्याचेवर रितसर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.घटनेची माहिती मिळताच श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे पीआय पी.डी.बाबर यांनी भेट दिली.अधिक तपास पोसई आर.टी.सुर्यवंशी हे करीत आहेत.

## बेकायदेशीररित्या वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशीयांवर न्यायालयाने सुनावणी सजा

प्रवासी कागदपत्राशिवाय अवैध मार्गाने भारत-बांगला सिमेवरुन लपत छपत भारतात प्रवेश करून पनवेल परिसरात अनधिकृतपणे वास्तव्य केल्याचे निष्पन्न झाल्याचे त्यांच्या विरुद्ध तालुका पोलीस ठाण्यात पारपत्र (भारतात प्रवेश), नियम १९५० चे कलम ३ (ए), ६ (ए) सह विदेशी नागरिक अधिनियम १९४६ चे कलम १४ (ए) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर आरोपींवर तपासअंती मा.न्यायालयात पुराव्यासह दोषारोपत्र सादर करण्यात आले होते. सदर खटल्याची मा.न्यायालयाने सुनावणी सुरू केली. परंतु आरोपींनी सदरचा गुन्हा कबुल न केल्याने साक्षी पुरावे नोंदविण्यात आले व सुनावणी अंती मा.जेएमएफसी पनवेल न्यायालय इंदलकर यांनी तीन्ही आरोपींना सदर खटल्यात दोष सिद्ध ठरवून त्यांना विदेशी नागरिक अधिनियम कलम १४ अन्वये ०२ वर्षे सक्तमजूरी व १ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास ३ महिने साधी कैद अशी सजा सुनावली आहे. सदर आरोपींना सजा होण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांच्यासह तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन पगार, कोर्ट पैरवी पोलीस हवालदार अजित म्हात्रे व त्यांच्या पथकाने विशेष मेहनत घेतली आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते आम्ही मौजे : वेश्वी, ता.उरण, जि.रायगड येथील खाली नमूद केलेली मिळकत अमृत पोशा पाटील व विकास पोशा पाटील यांजकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| वेश्वी, ता.उरण, जि.रायगड | २९/२६ | ०-११-००<br>पो.ख. ०-०१-०० | ०.२५ |

तरी सदर मिळकतीचे बाबतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्श्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, ॲटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आम्ही सदर मिळकतीचे विक्री व हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करू व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.३०/०३/२०२२

**सही/-**
**कनू एम.ठक्कर**
**७, राधा निवास, ७ राजावाडी रोड,**
**घाटकोपर (पू), मुंबई-४०००७७**
**मो.नं.९३२२५५१४१४**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल **१) श्री.सुधीर पुंडलिक पाटील २) श्री.सुरेश पुंडलिक पाटील** दोघे रा.पारगांव डुंगी, ता.पनवेल, जि.रायगड यांना त्यांचे वडील **श्री.पुंडलिक गोमा पाटील** रा.पारगांव डुंगी, ता.पनवेल, जि.रायगड, यांनी त्यांच्या सामाईक मालकीची मिळकत सिडकोने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमान तळासाठी २२.५ टक्के योजनेप्रमाणे जमिनीचे संपादीत करण्यात आलेली असून सदरहू संपादनापोटी मिळणारा भूखंडाचे क्षेत्रफळ १८९० चौ.मी. पैकी **श्री.पुंडलिक गोमा पाटील** त्यांच्या हिश्श्यास ९४५ चौ.मी. इतके क्षेत्रफळ मिळाले असून सदर भूखंड बक्षिसपत्रान्वये दोन्ही मुलांना ५०-५० टक्के देण्याचे / हस्तांतरण करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| नोड | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पकनगर-दापोली | ७ | ११४ | ९४५ चौ.मी.<br>४७२.५ चौ.मी.प्रत्येकी |

तरी वरील वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांची कोणाचाही दान, गहाण, तारण, लिन, चार्ज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसात आम्हाला आमचे खालील पत्यावर समक्ष येवून भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी वरील नमूद केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसात जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून विकसनाचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,

**सही/-**
**ॲड.रेखा किशोर होवाळे**
**शॉप नं.१३, सेक्टर १ ए, प्रभात सेंटर**
**सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई-४००६१४**
**मो.नं.९८१९६३०६३२**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल **श्री.महेंद्र मारुती पाटील** रा.पारगांव डुंगी, ता.पनवेल, जि.रायगड यांना त्यांचे वडील **श्री.मारुती गोमा पाटील** रा.पारगांव डुंगी, ता.पनवेल, जि.रायगड यांनी त्यांच्या सामाईक मालकीची मिळकत सिडकोने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमान तळासाठी २२.५ टक्के योजनेप्रमाणे जमिनीचे संपादीत करण्यात आलेली असून सदरहू संपादनापोटी मिळणारा भूखंडाचे क्षेत्रफळ १८९० चौ.मी. पैकी ९४५ चौ.मी. इतके **श्री.मारुती गोमा पाटील** त्यांच्या हिश्श्यास मिळालेला सदर भूखंड बक्षिसपत्रान्वये देण्याचे / हस्तांतरण करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| नोड | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पकनगर-दापोली | ७ | ११४ | ९४५ चौ.मी. |

तरी वरील वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांची कोणाचाही दान, गहाण, तारण, लिन, चार्ज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसात आम्हाला आमचे खालील पत्यावर समक्ष येवून भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी वरील नमूद केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसात जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून विकसनाचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,

**सही/-**
**ॲड.रेखा किशोर होवाळे**
**शॉप नं.१३, सेक्टर १ ए, प्रभात सेंटर**
**सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई-४००६१४**
**मो.नं.९८१९६३०६३२**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# विद्यार्थी हितासाठी झटताना ज्ञानगंगा संस्थेची निर्मिती शिक्षणास निश्चितच पूरक : चित्रलेखा पाटील



**दै.रायगड नगरी । मुरुड**

येथील पीएनपी नाट्यगृहाच्या भव्य सभागृहात ज्ञानगंगा विद्यार्थी शिक्षक कल्याणकारी सामाजिक संस्थेची पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून बोलताना, पीएनपी शिक्षण संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील यांनी खेड्यापाड्यात काम करणाऱ्या शिक्षकांच्या कामाचे कौतुक केले. समाजसेवेच्या ध्यासापोटीच ज्ञानगंगा ट्रस्टची निर्मिती झाल्याचे सांगितले. उच्च शिक्षण देण्याच्या तुलनेत प्राथमिक शिक्षणाचे धडे गिरवून घेणे, हे अधिक कष्टाचे काम असल्याचे सांगतानाच सदर ट्रस्टसाठी एक लाख रुपयांची मदत जाहीर केली.

यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष वैभव पिंगळे यांनी आपल्या प्रास्ताविकात शिक्षक आणि विद्यार्थी यांच्या हिताचे विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले.

शिक्षक नेते आणि ट्रस्टचे सल्लागार प्रमोद भोपी यांनी शिक्षण, आरोग्य, कला, क्रीडा, साहित्य आणि सामाजिक अशा विविध समित्या स्थापन करुन याद्वारे गरजवंतापर्यंत सर्व प्रकारची मदत करण्याचा दृढ निश्चय व्यक्त केला. यावेळी अलिबाग पंचायत समितीचे वरिष्ठ विस्तार अधिकारी कृष्णा पिंगळा यांनी ट्रस्टला शुभेच्छा देताना, शैक्षणिक गुणवत्ता वाढण्यासही सदर संस्था महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल असे सूतोवाच केले.

यावेळी ट्रस्टच्या निर्मितीमागील हेतू, भूमिका, जमाखर्च , आजीवन सभासद यादी वगैरे बाबी ट्रस्टचे सचिव सुबोध पाटील यांच्या कल्पनेतून प्रदर्शित करण्यात आल्या. सदर सभेस खूप मोठ्या संख्येने शिक्षक सभासद उपस्थित होते. प्रमुख उपस्थितांमध्ये उपाध्यक्ष प्रतिभा पाटील, प्राथमिक शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र म्हात्रे, शिक्षकनेते नरेंद्र गुरव, नित्यनाथ म्हात्रे, दयानंद अंजर्लेकर, उमेश ठाकूर, अनिल नाईक, सुनील पाटील, जयवंत वाणी,रवींद्र थळे,विनायक भोनकर, मनिषा अंजर्लेकर, प्रवीण पाटील, जितेंद्र पाटील, सुभाष मोकल, महेश कवळे, विलास पाटील, विजय गुरव, दीपक पाटील, दिलीप झावरे, निलेश तुरे, केंद्रप्रमुख सुरेंद्र पाटील, सचिन कांबळे,निलेश वारगे , संजय पोईलकर,संतोष जाधव, रवींद्र साळुंखे, प्रिया पाटील, दिव्या सारंग आदी मान्यवर उपस्थित होते. या दिमाखदार कार्यक्रमात बळीराम पाटील यांच्या सुश्राव्य ईशस्तवन आणि स्वागतगीताने सारे सभागृह मंत्रमुग्ध झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खजिनदार अजित हरवडे यांनी तर आभार प्रदर्शन प्रमोद भोपी यांनी केले.

# संक्षिप्त...

## म्हसळा येथे श्री स्वामी समर्थ धाम आणि श्री स्वामी समर्थ मूर्तीची प्राण प्रतिष्ठा

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा हिंदु ग्रामस्थ मंडळ ट्रस्टचे श्री स्वामी समर्थ धाम जिर्णोद्धार आणि श्री स्वामी समर्थ मूर्तीची प्राण प्रतिष्ठा संपन्न झाली. दोन दिवस म्हसळा हिंदू ग्रामस्थ मंडळाने मंदीर परीसरांत व गावांत धार्मिक संस्कारमय वातावरण केले होते.

रवीवार दि.२७ मार्च रोजी श्रीस्वामींच्या मूर्तीची श्री गणेश मंदीर, ब्राह्मणआळी, जैन कॉलनी, प्रभू आळी, कुंभारवाडा, एस.टी. स्टँड परिसर, बाजारपेठ,सोनार आळी, तांबट आळी, दातार आळी, कन्या शाळा परिसर या भागातून ढोल –ताशाच्या गजरांत भगव्या पताका घेऊन मिरवणुक काढण्यांत आली. सोमवार दि.२८ मार्च रोजी प्रायाश्चित्त, मंडप प्रवेश, शांतिपाठ,देवता नमस्कार, गणेश स्तुती, श्रीग्रामदैवत, भैरव मंडळ पूजन, रुद्र कलश पूजन, नवग्रह मंडळ पूजन, मूर्ती जलाधिवास, प्राणप्रतिष्ठा आरती आदींचे , आयोजन दापोली असूद येथील पुरोहीत पं. वैभव विजय जोशी व त्यांचे सहकाऱ्यानी मंत्र जागरा सह उत्कृष्टरीत्या पूर्णत्वाला नेले.

स्वामिनी केली किमया आणि स्वताचे वास्तव्य केले तयार म्हसळा शहरांतील श्री लखमेश्वर मंदीर आणि परिसरांत असलेले निर्सगरम्य स्थळी सुमारे १६० वर्षाचे महाकाय वटवृक्ष २–३ जून २०२० च्या निर्सग चक्री वादळांत पडून झालेल्या नुकसानीत सन २००३ साली बांधलेल्याश्री स्वामी समर्थ धाम (मठ) आणि श्री स्वामी समर्थ मूर्ती भंग पावली होती.निर्सग चक्री वादळांत शहरांतील बहुतांश घरे उध्वस्त झाली असताना भाविकांची घरे झाल्यावर मठाचा जिर्णोद्धार करू असा कौल आल्याने ग्रामस्थ मंडळी निश्चिंत होती, या कालावधीत मूळचे म्हसळ्याचे सध्या व्यवसायानिमीत्त वास्तव्य दापोली येथे आसलेले श्री.अशोक केरू पोतदारयानी ग्रामस्थांपुढे प्रस्ताव ठेवला मी श्री स्वामी समर्थ धाम (मठ)आणि श्री स्वामी समर्थ मूर्ती प्राण प्रतिष्ठाकरून स्वामीना आणि ग्रामस्थाना सेवा अर्पण करीन असे सांगितले . श्री.अशोक केरू पोतदार पत्नी श्रीमतीअस्मिता अशोक पोतदार, जावई प्रशांत मोहन मुसलोणकर, मुलगी श्रध्दा प्रशांत मुसलोणकर या सर्वानी संकल्प पूर्ण केला, तब्बल दोन दिवसाचा विधीवत कार्यक्रम पूर्ण करण्यासाठी शहर हिंदू ग्रामस्थ अध्यक्ष सुभाष उर्फ बाळशेट करडे, आणि संचालक सुनिल उमरटकर, नंदू गोविलकर,योगेश करडे,दत्ता हेगिष्टे,छोटूदादा करडे, सुशिल यादव, बाळा एडवी, श्रीमती भक्ती करडे, गौरी पोतदार,पुष्पा वाळवटकर आदी ग्रामस्थानी कार्यक्रम यशस्वी केला.



## शिवसेना मा. नगरसेवक लक्ष्मण कुरघोडे यांचे दु:खद निधन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शिवसेना माजी नगरसेवक लक्ष्मण दशरथ कुरघोडे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे.



शिवसेनेचे मा नगरसेवक, एकता मित्र मंडळ लाईन आळी, पनवेलचे आधार स्तंभ लक्ष्मण दशरथ कुरघोडे यांचे अल्पशा आजाराने निधी झाले आहे. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, मुलगा, मुली, जावई , सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


मा.इंदलकर सो.यांचे कोर्ट

**ॲड.अनमोल स. पवार**
**अर्जदारांचे वकील**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात

फौ.चौ.अर्ज नं.३९८/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०५/०५/२०२२

**श्री.अफझल अब्बदुल हमीद** — अर्जदार

विरुद्ध

**मा.ग्रामसेवक सो वहाळ ग्रुप ग्रामपंचायत** — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी **कु. अझमिया शेख** याचा जन्म दि.१२/०६/२०२० रोजी ओम साई हॉस्पिटल, सेक्टर १९, उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे जन्म झालेले आहेत. त्याअर्थी अर्जदार श्री.अफझल अब्बदुल हमीद यांचा अर्ज जन्म–मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) अन्वये **कु.अझमिया शेख** यांच्या जन्माची नोंद करून मिळणेबाबत अर्ज केलेला आहे.

सदरकामी कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.न्यायालय वरील अर्जदार यांच्या अर्जाकामी पुरावा घेण्याची जन्म–मृत्यू नोंद अधिनियम १९६९ कलम १३ (३) अन्वये **कु.अझमिया शेख** यांच्या जन्माची उशिरा नोंद करून मिळणेबाबतचा दाखल केलेला अर्ज मंजूर करील.

आज दि.२९/०३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक फौ.न्याया, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल**


# अवघ्या पाच ते सात तासांत हेलिकॉप्टरने अष्टविनायक दर्शन

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

हेलिकॉप्टर द्वारे अष्टविनायक दर्शन सेवा या अभिनव संकल्पनेचा शुभारंभ बुधवारी (ता.३०) झाला. यामुळे भाविकांना अष्टविनायक दर्शन अवघ्या पाच ते सात तासांत पुर्ण करता येणार आहे.



वरद हेलिकॉप्टर सर्विसेसचे हे हेलिकॉप्टर आहे. ओझर येथून सकाळी ८:४६ ला या हेलिकॉप्टरने पहिले उड्डाण घेतले. बी. व्ही. मांडे, वसंतराव पोखरकर, मीरा पोखरकर डॉ. सदानंद राऊत, डॉ. पल्लवी राऊत या पाच प्रवाशी भाविकांना घेऊन हे हेलिकॉप्टर बुधवारी (ता.३०) दुपारी १:४५ वाजता पालीत पोहचले. इथे बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. धनंजय धारप, उपाध्यक्ष विनय मराठे, विश्वस्त राहुल मराठे, सचिन साठे व माधव साने यांच्यासह शेखर सोमण व देवस्थान कर्मचाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. मांडे यांनी येथील हेलिपॅड व व्यवस्थापनाचे कौतुक केले. तसेच १४ जणांनी या हेलिकॉप्टर दर्शन सेवेसाठी आगाऊ बुकिंग केले असून अनेक जण विचारणा करत आहेत असे मांडे यांनी सांगितले. हेलिकॉप्टर पाहण्यासाठी नागरिक व लहनग्यांनी येथे मोठी गर्दी केली होती.

जे भाविक या सेवेचा लाभ घेतील त्यांना सर्व अष्टविनायक देवस्थान ट्रस्ट च्या वतीने सर्व प्रकारच्या सोयीसुविधा पुरविण्यात येणार आहेत. यामुळे भाविकांचा प्रवासातील वेळेची बचत होणार आहे. शिवाय हेलिकॉप्टर सफरीचा आंनद देखील घेता येणार आहे.

## आरोग्य शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जाणीव सामाजिक संस्था, नैना प्रकल्प बाधित शेतकरी उत्कर्ष समिती, तेरणा मेडिकल ट्रस्ट, मोरया डेंटल क्लिनिक, येरळा आयुर्वेदिक हॉस्पिटल आणि मेडिकल कॉलेज, रोटरी क्लब ऑफ पनवेल सनराइज् यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन सेंट मेरी शाळा, मरीआई हॉटेलच्या बाजूला सुकापुर येथे आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबीर ३ एप्रिल रोजी सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये डायबेटिस, नेत्र चिकित्सा, दंत चिकित्सा, ईसीजी, थायरॉईड, हाडांमधील कॅल्शियम व मोफत जनरल तपासणी करण्यात येणार आहे.

## परिक्षा पे चर्चा कार्यक्रम 2022 मध्ये पनवेल केंद्रीय विद्यालय ओएनजीसीचे विद्यार्थी होणार सहभागी




**दै.रायगड नगरी । पनवेल**

पंतप्रधान नरेंद्र मोदी १ एप्रिल २०२२ रोजी परिक्षा पे चर्चा हा पाचवा कार्यक्रम सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांसाठी संबोधित करणार आहेत. या कार्यक्रमात पनवेल केंद्रीय विद्यालय ओएनजीसी मधील ६३२ विद्यार्थी सहभाग घेणार असल्याची माहिती प्राचार्य सोहनलाल यांनी दिली आहे.

सदर कार्यक्रम हा बहुचर्चित आणि अत्यंत लोकप्रिय कार्यक्रम आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी या कार्यक्रमाच्या माध्यमाद्वारे परिक्षांमुळे विद्यार्थ्यांच्या मनावर येणारा ताणतणाव कसा कमी करता येईल याबद्दल आपल्या विशेष व आकर्षक शैलीमध्ये निराकरण करणार आहेत. या कार्यक्रमात मागील वेळी सुद्धा या शाळेतील विद्यार्थी अमन मणियार (इयत्ता १० वी) हा सहभागी झाला होता. यंदाच्या वर्षी सुद्धा ६३२ विद्यार्थी सहभागी होणार असल्याची माहिती प्राचार्य सोहनलाल याांनी दिली आहे. यावेळी पनवेल महानगरपालिकेच्या जनसंपर्क अधिकारी कुलकर्णी, हेड मास्तर सुनिता मियाणी उपस्थित होत्या. तरी या कार्यक्रमास सर्वांनी सहभाग घेवून महत्वपूर्ण असे मार्गदर्शन घ्यावे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी त्यांना असणारे प्रश्न विचारावेत, पालकांनी सुद्धा सहभाग घ्यावा व आपल्याला परिक्षेदरम्यान येणाऱ्या अडीचणी व ताणतणाव या त्यांच्या समोर मांडाव्यात.

## शाळा पूर्वतयारी अभियान प्रशिक्षण हा शासनाचा स्तुत्य उपक्रम : समीर घारे

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार सर्व राज्यामध्ये इयत्ता पहिलीत सन २०२२/२३ मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विविध अभियान राबवले जातात याचाच एक भाग म्हणून म्हसळा तालुक्यातील मेंदडी केंद्रस्तर शाळा पूर्वतयारी प्रशिक्षण म्हसळा रायगड जिल्हा परिषद शाळा वारळ मराठी येथे केंद्रप्रमुख किशोर मोहिते यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हसळा तहसीलदार माननीय समीरजी घारे, सरपंच रमेश खोत मेंदडी ग्रामपंचायत सरपंच राजेश्री कांबळे, शाळा समिती अध्यक्ष– सुषमा सायगावकर, मोरेश्वर पाटील माजी सरपंच नथुराम खोत, ग्रामस्थ मंडळ अध्यक्ष शामकांत पाटील,तलाठी गोरखनाथ माने, मुख्याध्यापक दगडुसाहेब शिंदे अंगणवाडी सेविका संध्या म्हात्रे व इतर मान्यवर उपस्थित होते.

सुरुवातीला दिपक पाटील यांनी प्रास्ताविक करताना या प्रशिक्षणाची उद्दिष्टे,हेतू,रचना याबाबत माहिती दिली. तज्ञ मार्गदर्शक श्री नरेश गायकवाड व सोनाबाई शिंदे यांनी या प्रशिक्षणामध्ये लावण्यात आलेल्या ७ स्टॉलबाबत माहिती दिली यामध्ये नोंदणी/विकास पत्र, शारीरिक विकास, बौध्दिक विकास, सामाजिक व भावन या समीर घारे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शासनाने राबवलेल्या उपक्रम हा स्तुत्य असल्याने याचे स्वागत केले. इयत्ता १ली मध्ये दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने आज विविध शैक्षणिक स्टॉल मांडण्यात आले यामध्ये विविध भाषिक व गणिती खेळ, कागदापासून बनवलेले विविध साहित्य यामधून आपल्या विद्यार्थ्यांना शाळेची आवड निर्माण होईलच पण यासोबत विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व बौद्धिक विकास होईल हा उपक्रम यशस्वीपणे राबवण्यासाठी या केंद्रातील शिक्षक, सरपंच व ग्रामस्थांनी खुप मेहनत घेतली. लेझीम, ढोल ताशांच्या गजरात गावातून मिरवणूक काढून विद्यार्थ्यांना सोबत घेऊन शाळेत आणले स्वागत केले यावरून हा उपक्रम नक्कीच यशस्वी होईल असा विश्वास व्यक्त केला.

## यु.ई.एस. कॉलेज येथे रक्तदान शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण येथील यु.ई.एस. कॉलेज ऑफ मॅनेजमेंट न्ड टेक्नॉलॉजीच्या एन.एस.एस. विभागाद्वारे नेरुळ येथिल तेरणा ब्लॅड सेन्टर आणि लायन्स क्लॅब, उरण यांच्या संयुक्त विद्माने मंगळवार दिनांक ३० मार्च २०२२ रोजी सकाळी १० ते ४ दरम्यान रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. यु.ई.एस. संस्थेचे अध्यक्ष आर्किटेक्ट तनसुख जैन, सहसचिव श्री. चंद्रकांत ठक्कर, सिनियर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या, स्कूल व ज्यु. कॉलेज प्राचार्या, सिनियर कॉलेजच्या एचओडी तसेच पूर्व प्राथमिक व प्राथमिक, माध्यमिक विभागातील सुपरवायझर्स, एन.एस.एस. विभागाच्या प्रमुख उपस्थित होत्या. ह्या रक्तदान शिबिरात मोठ्या संख्येने विद्यार्थी, शिक्षक आणि लोकांचा सहभाग लाभला होता. एकुण २८ जणांनी रक्तदान करुन 'रक्तदान हेच जीवनदान' ह्या सुंदर विचारांना सत्यात उतरवले.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, १) श्रीमती.इंद्राबाई बुधाजी घरत, २) श्री.संतोष बुधाजी घरत, ३) श्रीमती.मंदा एकनाथ केणी, ४) श्रीमती.सुनंदा सत्यवान पाटील, ५) श्रीमती.सुनिता निवृत्ती म्हात्रे रा.कुटुक बंधन, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांना फाईल नं.२४४, येथील खारघर नोड, प्लॉट नं.६८ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबईकडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. तसेच वर नमूद शेतकरी यांनी माझे अशिल श्रीमती.तसलीम मुनीर पटेल रा.घर नं.१११९, सेक्टर ३०, ओवे खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२१० त्रिपक्षीय करारनामा हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक २४४ खारघर नोड**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| खारघर | ३० | ६८ | ९९.८५ चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लीज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/–**
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सोसायटी,**
**प्लॉट नं.ई १२४/१३, सेक्टर १३,**
**खारघर, नवी मुंबई–४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**



मा.सोनावणे साहेब कोर्ट

**ॲड.शशिकांत काळू म्हात्रे**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.४६२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०५/०५/२०२२

१) श्री.राम बाळ्या उर्फ बाब्या म्हात्रे
वय : ४७ वर्षे, धंदा : शेती
मु.ओवे, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.कल्पना रामदास भगत
वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी
मु.आंबिवली, पो.नेरे, ता.पनवेल, जि.रायगड
३) निर्मला यशवंत भोईर
वय : ४५ वर्षे, धंदा : गृहिणी
मु.वळवली, पो.नावडे, ता.पनवेल, जि.रायगड
४) शशि बाळाराम म्हात्रे
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.कुर्डुस, ता.पेण, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांची बहिण **कै.सुमन अण्णा म्हात्रे ह्या दि.०९/११/२०२१ रोजी मु.ओवे, पो.खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड** येथे मयत झाल्या आहेत. तसेच त्यांची आई **कै.जनाबाई बाब्या म्हात्रे ह्या दि.१३/११/२०१५ रोजी मु.ओवे, पो.खारघर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, येथे मयत झाल्या आहेत. कै.सुमन अण्णा म्हात्रे** यांच्या आईच्या नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| तळोजा पाचनंद | १२९ | ३०३ | ५ क | ०–११–२ |
| | | ३०३ | ५ ब | ०–०६–१ |

सदरच्या मिळकती ह्या नवीन मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने संपादीत केल्या आहेत. सदर मिळकतीचा ॲवॉर्ड **कै.सुमन अण्णा म्हात्रे** यांच्या आई **कै.जनाबाई बाकू म्हात्रे** या नावाने प्रसिद्ध झालेला आहे. सदर वर नमूद मिळकतीत कै.सुमन अण्णा म्हात्रे त्यांचे पश्चात त्यांचे वारसदार या नात्याने अर्जदार यांचा सामाईक हिस्सा आहे.

तसेच वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत **कै.सुमन अण्णा म्हात्रे** यांचे वारसदार या नात्याने **कै.सुमन अण्णा म्हात्रे** यांचे हिश्श्याचे सरकारकडून मिळणारे किंवा सिडकोकडून मिळणारे १२.५ टक्के भूखंड तसेच इतर आर्थिक फायदे मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील **कै.सुमन अण्णा म्हात्रे** यांचे हिश्श्यास अर्जदार हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख ३०/०३/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**



Sonwane Judge

**Process Fee of rupees 50 paid**

**Adv.Narendra Sharma**

### PUBLIC NOTICE

**BEFORE THE HONOURABLE COURT OF CIVIL JUDGE SENIOR DIVISION, RAIGAD AT PANVEL**

CMA 434/22
Exhibit No. 8/D
Next Date : 15/06/2022

1) Mrs.Sagrika Ratan Paul @ Sagrika Ratan Pal — Applicant 1
2) Mr.Ramesh Chandra Paul @ Rameshchandra Ratan Pal — Applicant 2
3) Mr.Rahul Ratan Paul Alias Rahulchandra Ratan Pal — Applicant 3

NOTICE is hereby given to the public at large that

1) That, Late. **MR.RATAN MOY PAL ALIAS RATAN MOY PAUL ALIAS R.M.PAUL,** died intestate on 05.08.2014 at Panvel and is survived by his wife Mrs.Sagrika Ratan Paul @ Sagrika Ratan Pal, Applicant no 1, and two sons i.e. applicant no 2 and applicant no 3 respectively, herein are his sole surviving kith and kin of Late **MR.RATAN MOY PAL ALIAS RATAN MOY PAUL ALIAS R.M.PAUL,** the mother of Late, **MR.RATAN MOY PAL ALIAS RATAN MOY PAUL ALIAS R.M.PAUL,** has predeceased him on 31 st October 1981, At the time of Late **MR.RATAN MOY PAL ALIAS RATAN MOY PAUL ALIAS R.M.PAUL'**s demise, he was residing with the applicants 1 at : Room No.104, 1 st Floor, Niwara Housing Society, Palaspe, Peth Gaon, Panvel, Raigarh, Maharashtra.

2) Applicants have filed for the Sucession certificate of late **MR.RATAN MOY PAL ALIAS RATAN MOY PAUL ALIAS R.M.PAUL,** who died intestate on 5 th August 2014 at Panvel Navi Mumbai before the Civil Judge Senior Division at Panvel.

1) That the subject matter and movable property of the deceased is mentioned as follows.

**SCHEDULE OF IMMOVABLE PROPERTY**

Room No.104, First Floor, admeasuring 525 Sq. Ft. i.e.48.79 Sq.Mtrs. Build Up Area & 190 Sq. Ft. i.e. 17.65 Sq.Mtrs. Tarrace Area, in Building known as Niwara HSG Society, constructed on Survey No.123 Hissa No.15, Plot No.1, Admeasuring 280 Sq. Mtrs. Laying and situate at Kolkhe Village, Palaspe, Peth Gaon, Taluka Panvel, District-Raigad. Maharashtra., which is valued at Rs. 4,75,000/- (Rupees Four Lacks Seventy Five Thousand Only)

ALL PERSONS other than applicants having any claim against, in, to or upon the above said property or having any objection with respect to the application for Heirship Certificate by way of inheritance agreement, contract, sale, mortgage, possession, gift, lease, lien, charge, trust, maintenance, easement or otherwise howsoever are hereby required to notify the same in writing along with the supporting documentary evidence in the Court of Civil Judge Senior Division (S.D.) Panvel, within 30 days from the date hereof otherwise it will be deemed that there is no objection for issue of the Heirship Certificate on the name of proposed applicant herein. It is to note that the objection raised after the completion of said period of 30 days will not be considered.

Sd/- Jr.Clerk Civil Court, Panvel | Court Seal | Sd/- Asst.Superitent. Civil Court, Panvel

# पावसाळ्यापूर्वी साळाव - मुरुड रस्त्यांची कामे होणार काय ? वाहनचालक व प्रवासी वर्गाचा सवाल

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

साळाव – मुरुड रस्त्यावरील वाघोबा मंदिर पांगाळे दांडा व मोरे फाटा ते मजगांव गावठाण दरम्यान रस्त्यावरील अर्धवट डांबरीकरण रस्ते वाहनचालक व प्रवासी वर्गाची डोकेदुखी ठरत असून अपघाताला आमंत्रण देत असून पावसाळ्यापूर्वी या रस्त्यावरील रखडलेली कामे पूर्ण होतील काय ? असा सवाल नागरिकांतून विचारला जात आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून साळाव – मुरुड रस्त्यावर अनेक ठिकाणी असलेल्या झाडाझुडुपांचा विळखा तसेच काही ठिकाणी खाली आलेल्या झाडांच्या फांद्या वाहतुकीला अडथळा ठरत



असून त्या पावसाळ्यापूर्वी हटविणे गरजेचे आहे. विहूर,मोरे ते मजगांव, उसरोली फाटा, नांदगाव बाजार ते बाजारपेठ,वाघेश्वर नगर,दांडा,सर्वे, काशिद, काशिद यु–टर्न,बारशिव,बोर्ली स्टँड,कोर्लई भागात रस्त्यावर खड्ड्यांमुळे प्रवासी व वाहनचालक यांना त्रास व हाल सहन करावा लागत आहे. याकडे संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षा बाबत नाराजीचा सूर दिसून येत असून रस्त्याच्या साईडपट्ट्या साफ करण्याची मागणी केली जात आहे तसेच काही ठिकाणी रस्त्यावर झाडांच्या फांद्या वाहतुकीला अडथळा ठरत आहे.मुरुड –जंजिरा किल्ला, काशिद बीच पर्यटनात याठिकाणी पर्यटकांची रेलचेल असते तर शनिवार रविवार रस्त्याच्या दुतर्फा वाहनांच्या रांगा असून वेळप्रसंगी ट्रॅफिक जॅम ला सामोरे जावे लागते आहे. साळाव – मुरुड रस्त्याच्या दुरावस्थे बाबत वेळोवेळी वृत्त पत्रातून देण्यात आलेले वृत्त सामाजिक कार्यकर्ते, विविध पक्षीय संघटनांची मागणी लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे या रस्त्यावर विहूर, मोरे, सर्वे भागात डांबरीकरण करण्यात आले आहे.यात विहूर पेट्रोल पंप ते मोरे नवीन मजगांव दरम्यान रस्त्यावरील डांबरीकरण उखडल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे.या रस्त्यावरील अर्धवट डांबरीकरण अपघाताला आमंत्रण ठरत आहे असून साळाव–मुरुड रस्त्यावरील कामे पावसाळ्यापूर्वी पुर्ण होणार काय ? असा सवाल नागरिकांतून विचारला जात आहे.

# संक्षिप्त...

## गव्हाण फाटा - दिघोडे रस्त्यावर डंम्पर व ट्रेलर मध्ये अपघात

**दै.रायगड नगरी । उरण**

गव्हाण फाटा ते दिघोडे रस्त्यावरून भरधाव वेगाने जाणाऱ्या व येणाऱ्या डंम्पर आणि ट्रेलर मध्ये अपघात होण्याची घटना घडली आहे. या अपघातात जिवितहानी झाली नसल्याचे समजत आहे.

नवीमुंबई पोलीस आयुक्तांनी सध्या गव्हाण फाटा ते दिघोडे रस्त्यावरून मालाची,दगड माती भरलेल्या अवजड वाहनांची वर्दळ करण्याचे परवाने संबंधीतांना दिले आहे. त्यामुळे रात्री अपरात्री मोठ्या प्रमाणात नवीमुंबई,चिरनेर, जेएनपीटी बंदराच्या दिसेने ये– जा करणाऱ्या अवघड वाहनांची रेलचेल सुरू असते.

त्यामुळे भरधाव वेगात ये– जा करणाऱ्या वाहनांच्या अपघाताची संख्या बळावली आहे.त्यात सोमवारी (दि२८) रात्रीच्या सुमारास दगड वाहून नेणाऱ्या टँम्पराला मालवाहू करणाऱ्या ट्रेलरनी धडक दिल्याची घटना घडली आहे.या झालेल्या अपघात जिवितहानी झाली नसल्याचे समजत आहे.

## आदित्य बिर्ला ग्रुप यांच्याकडून पनवेल महापालिकेस रुग्णवाहिका

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आदित्य् बिर्ला ग्रुप यांच्याकडून महानगरपालिकेस आज (२९ मार्च) बेसिक लाईफ सपोर्ट रुग्णवाहिका देण्यात आली. ही रुग्णवाहिका कंपनीच्या २०२२–२३ च्या सामाजिक दायित्व निधीतून(सीएसआर फंड) देण्यात आली आहे.

या रूग्णवाहिकेचे आज आयुक्त श्री. गणेश देशमुख यांच्याकडे हस्तांतरण करण्यात आले. यावेळीआदित्य बिर्ला सायन्स ण्ड टेक्नोलॉजी कंपनी प्रायव्हेट लिमिटेडचे डॉ. शिरीष ठाकरे, गौतम अग्रवाल, एच आर हेड दिनेश घाडगे,उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त गणेश शेटे, सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे,राजेश डोंगरे उपस्थित होते.

रायगड जिल्ह्यातून पनवेल येथे उपचारासाठी मोठ्या प्रमाणात रूग्ण येत असतात. उपजिल्हा रूग्णालयात देखील मोठ्या प्रमाणात रुग्णांची ये–जा सुरू असते. पनवेल महापालिका क्षेत्रातील आरोग्य सुविधांमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीकोनातून आयुक्त श्री .गणेश देशमुख विविध उपाय योजना राबवित आहेत. याच बरोबर कोरोना काळात साथरोगाशी मुकाबला करण्यासाठी आयुक्तांच्या प्रयत्नातून कळंबोली येथे कोविड समर्पित रूग्णालय सुरु करण्यात आले आहे.

महापालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागातून रूग्ण उपचारासाठी सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात येत जात असतात. या रुग्णवाहिकेचा पालिका कार्यक्षेत्रातील रुग्णांसाठी मोठा उपयोग होणार आहे.

# माथेरान करसनदास मुळजी ग्रंथालयला १२५ पूर्ण कार्यक्रमाची बैठक संपन्न

**दै.रायगड नगरी । माथेरान**

करसनदास मुळजी ग्रंथालय माथेरान २२ मे २०२२ ला १२५ वर्ष पूर्ण करत आहेत, त्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी आज करसनदास मुळजी वाचनालयात बैठक आयोजित केली होती, या वेळी मान्यवरांचे स्वागत करून कार्यक्रमा विषयी सविस्तर चर्चा विनिमय करण्यात आले, २२मे २०२२ला करसंनदास मुळजी ग्रंथालय ला १२५वर्षे पूर्ण होत आहेत त्या वेळी व पुढील वर्षभरात माथेरान नगरपालिका, रायगड जिल्हा ग्रंथालय संघ, कोकण विभाग राज्य ग्रंथालय संघ, यांच्या माध्यमातून अनेक विविध कार्यक्रम होणार आहेत, ग्रंथ दिंडी, ग्रंथपाल साठी कार्यशाळा, रायगड जिल्हा ग्रंथालयाला ७५वर्ष पूर्ण झाली आहे, त्या साठी एक स्मरणिका प्रकाशीत करण्यात येणार आहे.

शालेय विद्यार्थी ना वाचनालयाची ओढ निर्माण व्हावी यासाठी विद्यार्थ्यांनसाठी विविध स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे, बालवान्मय ची सोय असणे आवश्यक आहे तसेच सिनियर



सिटीजन साठी काही करता येईल का यासाठी प्रयत्न करणार आहेत,माथेरानच्या करसंनदास मुळजी वाचनालयाला १२५वर्ष जुना इतिहास आहे, मागील कोरोना काळ आणि सद्या इंटरनेट, मोबाईल सारख्या सोशल मीडियाशी तोड देत

> १२५वर्ष पूर्ण करणारी रायगड जिल्ह्यातील च नव्हे तर महाराष्ट्र आणि देशाच्या दृष्टीने एक महत्वाचे हे वाचनालय असून १२५वर्षे जुनी ग्रंथ संपदा या मध्ये सामावली आहे,असा अलौकिक ठेवा इतर कोणत्याही वाचनालयात बघायला मिळणार नाही.
>
> **संजय बोदांडे, अध्यक्ष जिल्हा ग्रंथालय**

आजही सुस्थितीत , दिमाखात दौलात उभी आहे याचा गर्व माथेरान कराना आहे , माथेरान ला आल्यावर एक मन शान्त आणि आपल्या वाचनछंद जोपासणारे अनेक पर्यटक येथे आवर्जून भेट देत असतात कोरोना, काळात वाचनालयाकडे थोडा दुरावा निर्माण झाला होता जुने सभासद असून ही काहींची हिरमोड होत होती परंतु आता नव्या जोमाने उमेदीने १२५ वर्ष साजरा करतात नवनवीन विचार आचार अमलात आणून १२५० नवीन सभासद पूर्ण करण्याचा मानस मुख्याधिकारी सुरेखा भणगे मॅडम यांनी व्यक्त केला त्यातून वाचनालय फंड व पुस्तकांची शाळा ही संकल्पना राबवता येईल, आजच्या सभेस सकारात्मक चर्चा झाली त्यात पुन्हा एकदा करंसनदास मुळजी वाचनालय आपले गतवैभव प्राप्त करून वाचू लागेल गोष्टी सांगू लागले हे नक्की आजच्या बैठकीस मुख्याधिकारी सुरेखा भणगे –शिंदे मॅडम, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संजय बोदांडे, प्रवाहक संजय भायदे,राजेश खेडेकर, रामदास गायकवाड, रत्नदीप प्रधान, प्रवीण सुर्वे, अंकुश ईचके, ज्ञानेश्वर सदगीर, अन्सार महापुळे, कर्मचारी नागरिक उपस्थित होते.

> माथेरान नगरपरिषद वाचनालयाची जी संख्या आहे, ती कशी वाढ होईल याकडे लक्ष देऊन येणाऱ्या पर्यटकांना वाचनाबाबत कशी सेवा देता येईल याकडे लक्ष केंद्रित करणार आहे शिवाय शालेय जीवनापासून वाचकांना वाचनाची कशी आवड निर्माण होईल या साठी प्रयोजन करण्यात येईल, नवनवीन संकल्पना पुढे आणून राबविण्यात येणार आहेत.
>
> **सुरेखा भणगे-शिंदे- मुख्याधिकारी, प्रशासन, माथेरान**

# यंदाचा उन्हाळा ठरला आजारांचा उन्हाळा ; कडक उन्हाळा; तब्येत सांभाळा

**दै.रायगड नगरी । दिघी**

रायगडात तापमान वाढ सुरूच आहे. दरम्यान गेल्या काही दिवसापासून सूर्य मोठ्या प्रमाणावर आग ओकताना दिसत आहे. शहरी भागाबरोबरच आता श्रीवर्धनमधील ग्रामीण भागात उन्हाची तीव्रता वाढल्याने आजारांची लक्षणं दिसून येत आहे. मात्र, या दिवसात कोणते आजार होऊ शकतात आणि त्यांची काळजी कशी घ्यायची यापासून प्रत्येक जण दुर्लक्षित आहे.

गावाकडे उन्हाळा सुरू झाला आहे. हवामान बदलामुळे अनेक ठिकाणचे तापमान ४० अंशावर येऊन ठेपलं आहे. उन्हाची तीव्रता सकाळी नऊ ते सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत भयानक स्वरूपात जाणवू लागली आहे. यावेळी दैनंदिन कामात उन्हामुळे आणि घामाने सर्वच हैराण झालेले असताना उन्हाचे चटके आणि घामासोबतच उन्हाळा काही रोगांनाही सोबत घेऊन आला आहे. अशात आरोग्याची काळजी घेणं खूप आवश्यक आहे. जर या रोगांकडे लक्ष दिलं नाहीतर त्याचे गंभीर परीणाम होऊ शकतात.

शरीरात पाण्याचं संतुलन योग्य प्रमाणात ठेवणं या दिवसात गरजेचं असतं. रोज जवळपास ८ ते १० ग्लास पाणी पिणे गरजेचं आहे. या दिवसात कमी पाणी पिणे आणि जास्त वेळ उन्हात राहणे यामुळे डिहायड्रेशनची समस्या होण्याची शकता अधिक असते. त्यामुळे कोणतीही रिस्क न घेता वेळीच डॉक्टरांचा सल्ला घेणे अधिक चांगले. डॉक्टरांनुसार गरमीमुळे डोकेदुखी आणि मायग्रेन समस्या अधिक भेडसावू शकते. गरमीमुळे रक्तनलिका आकुंचन पाव–तात. त्यामुळे मेंदुला होणारा रक्त पुरवठा कमी होतो. यात डोकेदुखी समोरच्या बाजूने सुरू होऊन मागच्या बाजूपर्यंत जाते. जास्त वेळ उन्हात घालवल्याने ही समस्या अधिक जाणवते. डिहायड्रेशनमुळे मेंदु, किडनी, मांसपेशी आणि हृदयाला नुकसान होऊ शकतं. चक्कर येणं, अशक्तपणा वाटणं आणि तहान लागणं ही डिहायड्रेशनची लक्षणे आहेत. जास्त ताप, अंगदुखी, घशात खवखवणे, सर्दी, डोकं दुखणे हे या रोगाची लक्षणं आहेत. हा त्रास तुम्हाला एक आठवडा होऊ शकतो. त्रास टाळण्यासाठी योग्य प्रमाणात हलक्या पदार्थांचं सेवन करणं गरजेचं आहे. या आजाराचे परीणाम अनेकदा गंभीर बघायला मिळतात.या दिवसात बाहेरील पदार्थ खाल्ल्याने हे आजार होण्याची शक्यता अधिक असते. पोटावर सूज येणे, पोट दुखणे, सतत टॉयलेटला जावं लागणे ही या आजाराची लक्षणे आहेत. उन्हाळ्यात शरीरातील पाण्याचे प्रमाण वेगाने कमी होते. भूक मंदावते, थकवा येतो, अस्वस्थ वाटते. हा त्रास कमी करण्यासाठी आहारात योग्य बदल करणे आवश्यक असते. त्यामुळे हा उन्हाळा सुसह्य करण्यासाठी शरीराला थंडावा मिळेल असा आहार घ्यावा. मुळे त्रास जाणवू लागला तर रुग्णालयाशी संपर्क साधावा.

# अंगणवाडी सेविका, मदतनीसांना प्रोत्साहन भत्ता थेट बँक खात्यात : ॲड.यशोमती ठाकूर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

पोषण ट्रॅकरचे काम उत्कृष्ट पद्धतीने केल्याने राज्यातील अंगणवाडी सेविका, मदतनीस यांना देण्यात येणारा प्रोत्साहन भत्ता थेट बँक खात्यात लवकरच जमा केला जाईल, अशी माहिती राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी दिली आहे. यासाठी सुमारे ५१ कोटी रुपयांच्या निधीचे वितरण करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याचेही त्यांनी सांगितले.

५५३ तालुक्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांना या निर्णयामुळे अनुक्रमे प्रत्येकी ५०० रु आणि २५० रु दरमहा प्रोत्साहन भत्ता मागील थकबाकीसह उपलब्ध होणार आहे. १ एप्रिल २०२१ ते ३१. ऑक्टोबर २०२१ या ७ महिन्यांच्या कालावधीसाठी सदर प्रोत्साहन भत्ता अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या थेट बँक खात्यावर देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्याच्या अंगणवाडी केंद्रातून ० ते ६ वयोगटातील मुले, गर्भवती महिला, स्तनदा माता यांना सकस पोषण आहार दिला जातो. याद्वारे दररोज जवळपास ७६ लाख लाभार्थींपर्यंत शासन पोहोचत आहे. ५५३ तालुक्यातील अंगणवाड्यांमधून पोषण आ–हार देत असतानाच पोषण ट्रॅकर या ॲपच्या माध्यमातून लहान मुलांची, तसेच नवजात शिशुच्या पोषणाची, वाढीचीही नोंद ठेवली जाते. या मुलांचे वजन, उंची आदीबाबतची माहिती अद्ययावत केली जाते. त्यानुसार या मुलांकडे लक्षही दिले जाते. या पोषण ट्रॅकर ॲपमधून मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी झटणाऱ्या, कुपोषण कमी करण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्या अंगणवाडी सेविकांना आणि मदतनीसांना हा प्रोत्साहन भत्ता मिळेल.

राज्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी पोषण अभियानांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. केंद्र आणि राज्य शासन यांच्या माध्यमातून निधीची तरतूद करून असे उपक्रम राबविले जातात. कोरोनाच्या काळात स्वतःचा जीव धोक्यात घालून घरोघरी जाऊन सर्वेक्षण करणाऱ्या अंगणवाडी सेविका, मदतनीस यांनी फार मोठी कामगिरी पार पाडली आहे, त्यामुळे त्यांच्या चांगल्या कामाचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन देणे हे शासन म्हणून आपले कर्तव्य असल्याचे ड. यशोमती ठाकूर यांनी सांगितले. महिला व बाल विकास विभागाच्या माध्यमातून अंगणवाडी सेविका, मदतनीस यांचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन नेहमीच प्रयत्नशील असल्याचे ॲड. यशोमती ठाकूर यांनी यावेळी सांगितले.

# म्हसळा नगरपंचायतीचा पाणीपट्टी कर थकबाकीदारांना कारवाईचा बडगा

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा नगरपंचायती मधील ज्या रहिवाशांना नोटीस देवुनही आपली थकीत मालमत्ता कर आणि पाणीपट्टी कर भरणा करीत नाहीत अशांवर म्हसळा नगरपंचायतीने कारवाईचा बडगा हाती घेतला आहे.

म्हसळा शहरातील अनेक रहिवाशांची ५ ते १० हजार रुपयांपर्यंतची कर वसूली बाकी आसुन ती २२ लक्ष इतकी आहे या पैकी मार्च अखेरीस केवळ ४३% इतकी वसुली झाली असल्याचे मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांनी माहिती देताना.नगरपंचायतीला दिलेले उदिष्ट साध्य करण्यासाठी जे मिळकतदार थकबाकीचा कर भरणार नाहीत त्यांच्यावर कडक कारवाई करून प्रथम त्यांचे घरातील नळजोडणी कनेक्शन खंडित करण्याचे कारवाई केली असता आठ जणांचा पाणीपुरवठा खंडित केला असल्याचे सांगण्यात आले.मालमत्ता कर आणि पाणीपट्टी थकवणाऱ्या नागरिक व आस्थापनावर कठोर कारवाईचा बडगा नगरपंचायतने उचलला आहे.नळकनेक्शन बंद करण्याची मोहीम नगरपंचायतने सुरु केल्याने थकबाकीदारांचे आता चांगलेच धाबे आता दणाणले आहेत. ग्राहकांनी पाणीपट्टी,मालमत्ता कर वेळेत भरावी यासाठी नगरपंचायतकडून सातत्याने पाठपुरावा केला जातो तरीही त्याकडे काही नागरिक दुर्लक्ष करतात.ग्राहकांनी वेळेवर थकबाकी भरुन कारवाईचा कटू प्रसंग टाळावा व नगरपंचायतीला सहकार्य करावे असे आवाहन मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांनी केले आहे.मालमत्ता कर न भरणाऱ्या ग्राहकांची घरातील मालमत्ता जप्त करून कर वसुल करण्याचे प्रोविजन नगरपंचायतीना आहे ती वेळ ग्राहकांनी येवु देवु नये यासाठी ग्राहकांनी वेळेतच कर भरावा अशी माहिती मुख्याधिकारी उकिर्डे यांनी देताना सांगितले.

# मद्य विक्री करणाऱ्याविरोधात गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बेकायदेशीररित्या मद्य विक्री करणाऱ्या एका इसमाविरोधाात खांदेश्वर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सेक्टर ४ आसुडगाव परिसराजवळ असलेल्या ढाब्याजवळ अवैधपणे मद्यविक्री होत असल्याची माहिती पोलिसांना मिळताच सदर ठिकाणी छापा टाकून २ हजार रुपये किंमतीचा मद्यसाठा हस्तगत केला आहे व याप्रकरणी म्हात्रे या व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# उभा सरसगड वणव्यात होरपळला, सजीवसृष्टी व वनसंपदा झाली बेचिराख

## वणवे रोखणारी प्रभावी यंत्रणा उभी करण्याची जनतेतून जोरदार मागणी


**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पाली सुधागड तालुक्यासह जिल्ह्यात माळरान पठार, जंगल व डोंगराळ भागात मोठ्या प्रमाणावर वणवे लागून वनसंपदा व जैविविधता नष्ट होतेय. पालीतील ऐतिहासिक सरसगड़ावर पुन्हा मोठा वणवा लागला. आणि या भीषण वनव्याने येथील वृक्षवल्ली व वनसंपदा गिळंकृत केली. उन्हाळ्याच्या दिवसात सर्वत्रच मोठ्या प्रमाणात लागणाऱ्या वनव्याने वनसंपदा उध्वस्त होऊ लागलीय.

सरसगडावर लागलेला हा वणवा मोठ्या प्रमाणात भडकला होता. या वनव्यात मोठी वनसंपदा, जीवसृष्टी आगित भस्मसात झाली. अनेकजण बेदरकारपणे वणवे लावतात. त्यामुळे वनसंपदा व पशुपक्षांची वाताहत होते. यासंदर्भात लोकांनी दक्ष राहिले पाहिजे. तसेच प्रशासनाने पुढाकार घेऊन वणवे लावणाऱ्यांवर कडक कारवाई झाली पाहिजे. असे यावेळी महेश पोंगडे महाराज यांनी सांगितले.

सुधागड तालुक्यातील डोंगर रानावनात, जंगलभागात सातत्याने वणवे लागण्याच्या घटना समोर येतात. यामध्ये वनसंपदा व जैविधतेचे अपरिमित नुकसान होते. सरसगड किल्ल्यावर अत्यंत भयंकर वणवा लागला होता. वणवा अधिक पसरला असता तर कदाचित मानवी वस्तीजवळ पोहचला असता. याबरोबरच वृक्षराजी आणि पशुपक्षांची देखील हानी झाली असती.

वणव्यांमुळे सापांची संख्या व प्रजाती नष्ट होत आहेत. भारतीय वन सर्वेक्षणाच्या (एफएसआय) अहवालानुसार देशात सर्वाधिक वणवे लागणा–या राज्यांमध्ये महाराष्ट्र पहिल्या दहात आहे. बहुतांश वणवे मानवनिर्मित आहेत. वणवे पेटविल्यामुळे पक्ष्यांची अंडी, पिल्लेही जळून जातात. त्यामुळे त्यांची संख्याही रोडावत चालली आहे हा वणवा एकदा पेटला की परिसरातील जंगल अगदी महिनाभरसुद्धा जळत राहू शकते. या वणव्यामुळे होणा–या उजाड डोंगरामुळे सर्वत्र



निसर्गसौंदर्याला, हिरवळीला हानी पोहोचून जंगलातील जैवविविधता, वन्यजीव, कीटक, पक्षी, सरपटणारे प्राणी आदी अनेकांचे अस्तित्वही धोक्यात आले आहे. औषधी वनस्पतीही नामशेष झाल्या आहेत. वणवा लागल्यानंतरच्या उपाययोजना हा कितीही प्रयत्न केला तरी अवघड विषय आहे तेव्हा शक्य असेल तर निसर्ग वाचवायला या कारण तोच आपला तारणहार आहे. असे महेश पोंगडे महाराज यांनी सांगितले.

कित्येक तास पालीचा सरसगड वणव्यात जळत आहे .त्याची हाक कोणालाच ऐकू येत नाही .दर वर्षी तो जळत आला आहे .आजही जळाला ,जळत असताना पक्षांचा किलबिलाट ऐकून अतिदुःख होत आहे .छोटे प्राणी यांची किंचाळी कोणाला ऐकायला गेली नाही .किल्ला नाही तर एक स्त्री जळत आहे असे ते दृश्य आहे .

वणवे का लागतात ,वणवे विजवायच्या उपाययोजना काय ?वणवे कोणी विझवावे ?वणवे विझवण्यासाठी किती निधी आणि कोणी ठेवायचा ?वन विभाग आणि पुरातन खाते यांचे अक्षम्य दुर्लक्ष ही कारणे दुर्लक्षित करून चालणार नाही ...किल्ला जळून गेला आम्ही थोडीच त्या साठी कँडल मोर्चा काढणार आहोत ?

विदेशात काही मिनिटात हेलिकॉप्टर मधून पाणी फवारणी करून वणवे विझवली जातात पण भारतात माणसांची नीट काळजी घेता येत नाही तिथे मुक्या प्राण्यांची आणि वृक्ष काळजी कशी घेतली जाईल ? पावसाची अनियमितता आणि उष्णेतेत होणारी वाढ रोखण्यासाठी विशेष प्रयत्न सर्वांनी मिळून केले पाहिजे ,अन्यथा विनाश अटळ आहे असे ह भ प पोंगडे महाराज यांनी स्पष्ट केले. महेश पोंगडे यांनी यासंदर्भात वनव्यांवर प्रबोधन व जनजागृती करणारी पोस्ट लिहून सोशल मीडियावर व्हायरल केली आहे. व वणवे रोखणे, तसेच वनसंपदेचे महत्व , व वृक्षवल्ली वाचवण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेणेबाबत भावनिक आवाहन देखील केले आहे.